# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 05.01.2013 (का.प.क्र.22) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शनिवार दिनांक 05.01.2013 (का.प.क्र.22) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 12.10 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा उपआयुक्त (प्रशासन) श्री.रविंद्र निकम, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
02. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
03. स. श्री.आगा खान मिया खान
04. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
05. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
06. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
07. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
08. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
09. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
10. स. श्री. खान अक्रम करीम खान
11. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
12. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

| | |
|---|---|
| श्री.समीर राजुरकर | :वर्तमानपत्रामध्ये प्रॉपर्टी टॅक्स खाजगीकरणबाबत जाहिरात प्रसिध्द झालेली आहे. आरएफक्यु कसे दिलेले आहे. वर्कआऊट कशा पध्दतीने होणार आहे. त्याचे मार्गदर्शक तत्वे कुठल्या आधारे तयार केलेले आहेत. याबाबत माहिती देण्यात यावी. |
| मा.सभापती | :प्रशासनाने खुलासा करण्यात यावा. |
| कार्य.अभियंता (श्री.कोल्हे) | :महानगरपालिकेला मार्गदर्शनासाठी नेमुन दिलेल्या क्रिसील या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेले आहे. रिक्वेस्ट फॉर क्वालिफिकेशन मागवत आहे. महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये टॅक्सेस वसुलीचा 3 वर्षाचा अनुभव असावा त्यास कमीत कमी 50 कोटी प्रतिवर्षी वसुली केल्याचा अनुभव असावा. (In Last five years) जॉईन्ट व्हेन्चर नॉट अलाउड केलेला असुन 10000 रूपये फिस नॉन रिफंडेबल द्यावयाची आहे. आरएफक्युच्या 10 दिवसानंतर प्रिबिडची बैठक आयोजित केलेली आहे. |
| श्री.समीर राजुरकर | :क्रिसील यांनी प्रॉपर्टी टॅक्स/रिव्हेन्यु वसुली पुर्वी केलेली आहे का? |
| कार्य.अभियंता (श्री.कोल्हे) | :पहिल्यांदाच वसुली करत आहे. |
| श्री.समीर राजुरकर | :प्रीबीड क्लिअर असले पाहिजे. यात कुठलेही हिडन अजेंन्डा नको. प्रॉपर्टी टॅक्स महत्वाचा विषय आहे नागरीकांच्या हिताचा विषय आहे. सर्व बाबी व्यवस्थित पार पाडायला हव्यात. |
| मा.सभापती | :मालमत्ता वसुली खाजगीकरण संदर्भात प्रशासनाने समिती नेमलेली |

आहे. माहिती देण्यात यावी.

**कार्य.अभियंता (श्री.कोल्हे)** :9 सदस्यांची समिती गठीत आलेली आहे. उपआयुक्त(म), उपआयुक्त (प्र), मुख्यलेखापरिक्षक,मुख्य लेखाधिकारी,कर निर्धारक संकलक,लेखाधिकारी, विधी सल्लागार, सहा.संचालक न.र. या सर्वांनी मिळुन नियोजन केलेले आहे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :वर्तमानपत्रामध्ये गुंठेवारी बातमी आलेली आहे की, आधी मंजूरी नंतर खोडा याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :मा.सर्वसाधारण सभेत याबाबतीत चर्चा झालेली आहे. गुंठेवारीमध्ये जी घरे 2001 पुर्वीची आहेत त्यांना नियमित केल्या जात होते. मध्यंतरी गुंठेवारीच्या संचिका पुटअप केल्यावर एफएसआयचा प्रश्न निर्माण केला गेला. 2001चा शासन निर्णयात एफएसआयपेक्षा अतिरिक्त असलेल्या बांधकामाबाबत दंडात्मक रक्कम आकारून त्यास नियमीत करण्यात यावे म्हणुन उल्लेख आहे. दोन महिण्यानंतर असे काय घडले की, वर्तमानपत्रामध्ये बांधकाम पाडून टाकण्याच्या बातम्या प्रकाशित होत आहे. गुंठेवारीबाबत प्रशासनाचे धोरण स्पष्ट करण्यात यावे. गुंठेवारीचे एवढे प्रकरणे का प्रलंबित आहे खुलासा करण्यात यावा.

**श्री.नारायण कुचे** :शहरात 117 गुंठेवारी वसाहती 37 नगरसेवक आहेत. गुंठेवारीबाबत वर्तमानपत्रामध्ये ज्या बातम्या येत आहेत त्याबाबत वार्डामध्ये नागरीक अनेक प्रश्न विचारत आहे की, घरे पडणार आहेत का? जनतेमध्ये धास्ती निर्माण झालेली आहे. घरे नियमित होता की नाही हा प्रश्न निर्माण झालेला आहे. तत्कालिन आयुक्त यांनी शिबीर आयोजित करून दंड आकारून घरे नियमित केले होते. परंतु आता वर्तमानपत्रामध्ये अनेक बातम्या येत आहे. गुंठेवारीचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात यावा. आजची सभा तहकूब करण्यात यावी.

**श्री.रेणुकादास वैद्य** :गुंठेवारी वसाहतीमध्ये शहरातील 40 टक्के नागरीक राहतात शासन निर्णयानुसार गुंठेवारी नियमीत करण्याबाबत निर्णय दिलेला आहे. परंतु प्रशासन याबाबतीत गांर्भियाने घेत नाही. एक चालन भरल्यानंतर नागरीक समाधानी होतो न होतो दुसरे चालन भरले नाही म्हणुन नियमीत झाले नाही. कधीही बांधकाम पाडु शकतो म्हणुन नागरीकांमध्ये दहशत निर्माण होत आहे. वर्तमानपत्रामध्ये ज्या बातम्या येत आहे त्या प्रशासनाने अधिकृत प्रेस नोट आहे का? नसेल तर ही गंभिरबाब आहे. सन 2005मध्ये साधारण 100 कॅम्प घेण्यात आले. दोन ते तीन हजार घरे नियमीत झाले. मागील दोन वर्षात एकाही ठिकाणी कॅम्प घेतलेला नाही. नगरसेवक वारंवार मागणी करत आहे. नागरीक पैसे भरण्यास तयार आहे. परंतु कॅम्प लावण्यात येत नाही. गुंठेवारी कक्ष आणि भोगवटा प्रमाणपत्र हया दोन गोष्टी मिक्स करण्यात येवु नये. गुंठेवारी कक्षात संवेदनशिल अधिकारी देण्यात यावा या अधिकाऱ्याच्या माध्मातुन जनजागृती करण्यात यावी. कॅम्प लावण्यात यावे. गुंठेवारीतील घरे नियमित करण्यात यावे.

**श्री.समीर राजुरकर** :गुंठेवारी संदर्भात टप्प्याटप्प्याने प्रशासनाने रिझल्ट द्यायला पाहिजे.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :दोन दोन वर्ष पैसे भरून चालन भरून घरे नियमित होत नाही हे योग्य नाही.

**श्री.आगा मियॉ खान** :सन 2005-06मध्ये चालन भरण्यात आले त्यानंतर सन 2012मध्ये

दुसरा हप्ता भरण्यासाठी नागरीक गेले असता सदरील संचिका नामंजूर करण्यात आली म्हणुन सांगण्यात आले. संचिका नामंजूर झ ााल्यावर चालान कशासाठी भरुन घेण्यात आले. नागरीकांना नगरसेवक म्हणुन आम्ही काय उत्तर देणार. प्रशासनास माहिती होते की, डिपी रोडमध्ये आहे तर चालान कशासाठी भरून घेण्यात आले. माझ्या वार्डात सिमा एजन्सीने काम केले होते सिमा एजन्सी गायब झ ाालेली आहे. आज नागरीकांना दुसऱ्या फाईल तयार करण्यास सांगण्यात येत आहे. गरीब नागरीक आहे. कुठून पैसे आणणार आणि संचिका तयार करणार.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :दोन मजली तीन मजली इमारती झालेल्या आहेत. गुंठेवारी 2001च्या नियामान्वये 2001 पुर्वीच्या घरांना एक एफएसआय मंजूरी द्यावी असा निर्णय झालेला आहे. माझी दोन महिण्यांपुर्वीच बदली झालेली आहे. या संचिका दोन महिण्यापुर्वीच प्रशासकीय विभागाकडे पाठविण्याची सुरूवात केलेली आहे.

मा.सभापती :संचिका किती पेडींग आहे खुलासा करण्यात यावा. संचिका मंजूर का होत नाही.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :15734 संचिका सबमिट झालेल्या आहे. त्यापैकी 5367 संचिका मंजूर झालेल्या आहेत.

मा.सभापती :आवक करून घेण्यात येत नाही त्या किती संचिका आहेत.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :10000 संचिका प्रलंबित आहे. 7270 हया सन 2001 च्या आधिची बांधकाम आहेत. डिपी रस्त्यामध्ये बाधीत व अपुर्ण कागदपत्र असल्यामुळे 3052 प्रकरणात सूचनापत्र देण्यात आलेले आहेत. वार्डामधुन आलेल्या संचिकेची छाननी करून त्या त्या प्रमाणात इश्यु केलेल्या आहेत.

श्री.समीर राजुरकर :सिमा एजन्सी बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

गुंठेवारी कक्ष प्रमुख :याबाबत माहिती घेवुन पुढील सभेत माहिती देण्यात येईल.

श्री.नारायण कुचे :वार्ड वाईज गुंठेवारी प्रकरणांची माहिती देण्यात यावी. अधिकारी कर्मचारी सर्वेला आल्यावर काहीतरी त्रुटी काढुन नागरीकांची दिशाभुल करतात व प्रकरणे पेंडींग ठेवतात. प्रशासनाला एखादे घर नियमीत करावयाचे वाटल्यास ते केले जाते नाहीतर तसेच ठेवले जाते. ज्या जनतेने आम्हाला निवडुन दिले आहे त्यांच्यासाठी काम करायचे आहे. गुंठेवारीचे घरे नियमित झालीच पाहिजे. तत्कालिन आयुक्तांच्या काळात किती संचिका मंजूर झाल्या व आता किती संचिका मंजूर झाल्यात खुलासा करण्यात यावा. गुंठेवारी भागातील घरे नियमित झाले पाहिजे. आदेश देवुन अंमलबजावणीसाठी प्रशासनाला आदेश द्यावा. काहीही चर्चा करायची नाही. सभा तहकूब करण्यात यावी. बाजुच्या वार्डातील घरे नियमित होतात परंतु माझ्या वार्डातील घरे नियमित होत नाही. चर्चा करण्यात येवु नये सभा तहकूब करण्यात यावी. गुंठेवारीबाबत प्रशासनाने योग्य निर्णय घ्यायला पाहिजे.

श्री.बाळासाहेब मुंडे :बाजुच्या वार्डातील घरे नियमित होतात परंतु आमच्या वार्डातील घरे नियमित होत नाही. त्या ठिकाणी नागरीक अनेक वर्षापासून राहतात त्यांचेकडे निवडणूक प्रमाणपत्र लाईटबिलचा पुरावा आहे त्यावरुन लक्षात येईल कि ते केव्हापासून त्या ठिकाणी राहतात.

**(एकाच वेळी अनेक स.सदस्य बोलत असतात)**

**श्री.गिरजाराम हाळनोर** :प्रशासन सभाधानकारक खुलासा करू शकत नाही.

**श्री.आगा खान** :गुंठेवारी नियमित करत असतांना कुठला पुरावा ग्राहय धरणार? नागरीक 1996-1997 पासून राहतात त्यांचेकडे त्या ठिकाणी राहण्याचा पुरावा आहे. परंतु संचिका प्रलंबित राहत आहे.

**मा.सभापती** :गुंठेवारी विभागामध्ये किती अधिकारी कर्मचारी आहे.

**गुंठेवारी कक्ष प्रमुख** :दुय्यम आवेक्षक आणि अभियंता मिळुन पाच कर्मचारी कार्यरत आहे. दुय्यम आवेक्षक यांना अतिरिक्त चार्ज देवुन काम करून घेण्यात येत आहे. गुंठेवारी आणि भोगवटा प्रमाणपत्र दोन्ही काम त्यांचेकडे देण्यात आलेले आहे.

**श्री.गिरजाराम हळनोर** :गुंठेवारीतील गरीब नागरीकांची कामे होत नाही परंतु भोगवटा प्रमाणपत्रांचे कामे लवकर होतात.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :दोन दोन वर्ष पैसे भरून गुंठेवारीचे काम होत नाही. भोगवटाचे कामे लवकर होतात.

**मा.सभापती** :भोगवटाकडे प्रशासनाचे जास्त लक्ष आहे. गुंठेवारीकडे दुर्लक्ष आहे. भोगवटा प्रमाणपत्राचे संचिका किती प्रलंबित आहे.

**गुंठेवारी कक्ष प्रमुख** :माहिती घेवुन किती प्रकरणे प्रलंबित आहे याची माहिती सादर करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हळनोर** :श्री.डि.पी.कुलकर्णी, गुंठेवारी विभागप्रमुख उपस्थित नाही. या ठिकाणी सविस्तर माहिती मिळु शकणार नाही. सदरील सभा नंतर घेण्यात यावी. गुंठेवारीचा विषय सामान्य नागरीकांसाठी महत्वाचा आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :दोन कक्ष वेगवेगळे आहेत दोन कक्षांना मिक्स केलेले आहे. त्यामुळे नागरीकांना त्रास होत आहे. भोगवटा बाबतचे प्रकरण तात्काळ निकाली काढले जाते. परंतु गुंठेवारी संचिका तशीच पडुन राहते. शहरातील 40 टक्के नागरीकांच्या जिवनाशी निगडीत प्रश्न आहे. आजच्या सभेत श्री.डि.पी.कुलकर्णी, सहा.संचालक न.र. नाही दोन्ही विषयाचे प्रमुख आहेत. सभागृहामध्ये हजर असते तर सर्व प्रश्नांचे उत्तरे मिळाली असती. श्री.नितीन गायकवाड दोन महिण्यांपुर्वीच रूजु झाल्यामुळे सदरील विषयाची पुरेशी माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही. सिमा एजन्सीबाबत माहिती सभेमध्ये कळायला हवी. दोन कक्ष वेगळे करण्यात यावी. गुंठेवारी कक्ष वेगळा करण्यात यावा. त्यांना अधिकारी कर्मचारी स्वतंत्र देण्यात यावे. सदरील सभा तहकूब करण्यात यावी.

**श्री.बाळासाहेब मुंडे** :पुढील सभेमध्ये वार्डवाईज प्रलंबित संचिका, नविन संचिका, दाखल संचिकाची माहिती देण्यात यावी.

**मा.सभापती** :स.सदस्यांनी जो विषय/मुद्दे मांडलेला आहे त्याबाबत संपुर्ण माहिती देण्यात यावी. गुंठेवारी आणि भोगवटा प्रमाणपत्र देणे हे दोन वेगवेगळे विषय आहेत. भिन्न विषय असल्याने यासंबधी वेगवेगळे विभाग करावे. दोन्ही विभागांमध्ये स्वतंत्र अधिकारी/कर्मचारी वर्ग देण्यात यावा. गुंठेवारी विभागात नागरीकांबाबतीत संवेदनशिल अधिकारी देण्यात यावा. गुंठेवारी महत्वाचा भाग आहे.नगरसवेकांची इच्छा आहे परंतु काम होत नाही. 36 वार्डसाठी दोन उपअभियंता असायला हवे. तसेच गुंठेवारी विभागात प्रलंबित वार्ड निहाय संचिका व गुंठेवारी बाबतची सविस्तर माहिती येणाऱ्या सभेत देण्यात यावी. आजची सभा तहकूब

**करण्यात येते.**

**(दुपारी 12.45 वाजता सभा तहकूब करण्यात आली.)**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**